नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १४७ Issue - 147 | वार बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ Blow- Wednesday Date 15 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अंतिम मतदारयादीत लाखो चुका

### मतदारयाद्यांच्या दुरुस्त्यांशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ' निवडणूक आयोग मुंबई महापालिका निवडणुकीत 'व्हीव्हीपॅट'ची सुविधा असलेली मतदानयंत्रे (ईव्हीएम) उपलब्ध करून देऊ शकत नसेल तर येथील निवडणूक मतपत्रिकेवर घ्यावी' अशी मागणी महाविकास आघाडीने मंगळवारी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याकडे केली. शिवाय, अंतिम मतदारयादीत लाखो चुका असल्याने मतदारयाद्यांच्या दुरुस्त्यांशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणीही आघाडीने केली.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आयोगाने १ जुलै २०२५ची मतदारयादी अंतिम केल्याच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने चोक्कलिंगम यांची भेट घेऊन मतदारयादी आणि निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला. महापालिका निवडणुकांसाठी 'व्हीव्हीपॅट' न वापरण्याच्या निर्णयावर शिष्टमंडळाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'सन २०२२ मध्ये होणे अपेक्षित असलेल्या स्थानिक निवडणुका २०२६मध्ये होणार आहेत. गेल्या चार वर्षांत निवडणूक आयोग कोणती तयारी करीत होता? हजारो कोटी रुपये खर्च करून मागवलेली 'व्हीव्हीपॅट' नक्की कुठे गेली? असे प्रश्न आघाडीच्या नेत्यांनी उपस्थित केले.

### मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याकडे महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाची मागणी

आघाडीच्या शिष्टमंडळाने चोक्कलिंगम राज्य निवडणूक आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यासोबत विरोधकांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ईव्हीएमवरील जनतेचा विश्वास, व्हीव्हीपॅटचा वापर, प्रभाग पद्धती रद्द करण्याची मागणी, दुबार मतदार नोंदणी आणि सदोष मतदार याद्या यांसारख्या अनेक गंभीर मुद्द्यांवर चर्चा झाली. मात्र, या बैठकीत ठोस तोडगा न निघाल्याने सर्व मुद्द्यांवर एकत्रितपणे विचारविनिमय करण्यासाठी आज, बुधवारी पुन्हा एक संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. स्थानिक निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाकडे, तर मतदारयादीची जबाबदारी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे आहे.

विरोधकांनी राज्य निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सामान्य जनतेचा 'ईव्हीएम'वर विश्वास नाही. त्यामुळे मतदारांसाठी खातरजमा करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'व्हीव्हीपॅट' आहे. तोच मार्ग तुम्ही बंद करणार असाल तर निवडणूक आयोगाच्या कारभारावर लोकांनी विश्वास कसा ठेवायचा? प्रभाग पद्धतीमुळे व्हीव्हीपॅट वापरता येत नसेल, तर ही प्रभाग पद्धतच रद्द करावी, अशी मागणीही विरोधकांनी केली. संपूर्ण भारतात महापालिका आणि नगरपालिकेतील प्रभाग निवडणूक पद्धत कुठेही अस्तित्वात नाही, याकडेही त्यांनी चोकलिंगम यांचे लक्ष वेधले.

राज्यात मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये मोठ्या संख्येने परराज्यातून येणारे कामगार मतदार म्हणून नोंदणी करतात. यातील अनेक जण त्यांच्या मूळ राज्यातही मतदार असतात. त्यामुळे दुबार नोंदणी टाळण्यासाठी आयोग काय उपाययोजना करत आहे, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. बिहारमध्ये दुबार नावे काढण्यासाठी आयोगाने विशेष मोहीम राबवली, मग महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी असा प्रयत्न का दिसत नाही, अशी विचारणा त्यांनी केली. दुबार नोंदणी काढण्यासाठी 'डी-डुप्लिकेशन' पद्धतीचा वापर करण्याची मागणीही विरोधकांनी केली.

विधानसभा निवडणुकीसाठी लाखो चुका असलेली मतदारयादी वापरण्यात आली आणि तीच यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वापरली जाणार आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने सुधारित निवडणूक यादीवर काम करावे, अशी भूमिका विरोधकांनी मांडली. मतदारयादीतील सर्व दोष दूर करून नव्याने यादी प्रसिद्ध केल्यानंतरच निवडणुका घ्याव्यात, अशी त्यांची मागणी आहे. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारीच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, मतदारयादीबाबत विरोधकांनी उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला निवडणुका पुढे ढकलण्याची विनंती करावी, असा आग्रहही विरोधकांच्या नेत्यांनी धरल्याचे समजते.

## द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विकासासाठी स्वतंत्र योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याला अभिवादन म्हणून त्यांनी स्थापन केलेल्या केलेल्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीअंतर्गत विविध शैक्षणिक संस्था, वसतिगृहांच्या इमारतींचा जीर्णोद्धार, जतन आणि संवर्धन करण्याकरिता स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या योजनेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांचे जतन आणि संवर्धन केले जाणार.

### पाच वर्षांसाठी ५०० कोटींच्या निधीची तरतूद

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी ८ जुलै, १९४५ रोजी द पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन केली.

या संस्थेमार्फत १९४६ मध्ये मुंबईत सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय, सिध्दार्थ नाईट हायस्कूल, १९५० मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे मिलिंद कला महाविद्यालय, मिलिंद विज्ञान महाविद्यालय, १९५५ मध्ये मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल आणि मिलिंद प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल, १९५६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे मिलिंद महाविद्यालय, १९५३ मध्ये मुंबईत सिध्दार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, १९५६ मध्ये सिध्दार्थ विधि महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, वडाळा सुरु करण्यात आले. याचबरोबर छत्रपती संभाजीनगर येथे अजिंठा बॉईज होस्टेल आणि प्रज्ञा मुलींचे वसतिगृह स्थापन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या स्थळांचा विकास करण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार नऊ महाविद्यालये आणि दोन वसतिगृहे यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी पुढील पाच वर्षात, दरवर्षी १०० कोटी याप्रमाणे ५०० कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

## वाचवा वाचवा! बस पेटताच प्रवाशांचा आक्रोश; १२ जण होरपळले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर: राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यात मंगळवारी दुपारी मोठा अपघात झाला आहे. जैसलपूरहून जोधपूरला निघालेल्या बसला अचानक आग लागली. त्यात तीन मुलं आणि चार महिलांसह १० ते १२ जण गंभीररित्या भाजले. त्यांच्या मृत्यूची भीती वर्तवली जात आहे. दुपारी साडे तीनच्या सुमारास थैयत गावाच्या जवळ हा अपघात झाला. द्रुघटनास्थळ जैसलमेरपासून २० किलोमीटर दूरवर आहे. बसला अपघात होताच परिसरात एकच खळबळ उडाली.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी तीनच्या सुमारास बस जैसलमेरहून ५७ प्रवाशांना घेऊन निघाली होती. थैयत गाव सोडल्यावर बसच्या मागील भागातून धूर निघू लागला. यानंतर अवघ्या काही मिनिटांत संपूर्ण बसनं पेट घेतला. प्रवाशांनी आक्रोश सुरु केला. अनेक जण दरवाजे, खिडक्या फोडून कसेबसे बाहेर पडले. ग्रामस्थ आणि वाटसरुंनी घटनास्थळी पोहोचून बचाव कार्य सुरु केलं. त्यांनी आसपासच्या भागातून पाणी आणि रेती आणून आग विझवण्याचा प्रयत्न केला. दुर्घटनेची



माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिसांचं पथक घटनास्थळी पोहोचलं. जवळपास तासभरात त्यांनी आग नियंत्रणात आणली.

दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचं पथक १० मिनिटांत घटनास्थळी पोहोचल्याची माहिती नगर परिषदेचे सहाय्यक अग्निशमन अधिकारी पृथ्वीपाल सिंह राठोड यांनी दिली. 'आम्ही घटनास्थळी पोहोचलो, तेव्हा बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. ज्याला आम्ही जिवंत बाहेर काढू, अशी एकही व्यक्ती त्यावेळी आम्हाला दिसली नाही. त्यावेळी अंदाजे १० ते १२ जण बसमध्येच होते,' असं राठोड यांनी सांगितलं. दुर्घटनेत जखमी झालेल्या स्थानिकांच्या आणि पोलिसांच्या मदतीनं तीन रुग्णवाहिकांच्या मदतीनं जैसलमरमधील जवाहर रुग्णालयात दाखल करण्यात आलं. गंभीररित्या जखमी झालेल्या प्रवाशांना प्रथमोपचारानंतर जोधपूरला हलवण्यात आलं. जवळच असलेल्या लष्करी तळावरील जवानांनीदेखील आद विझवण्यास मदत केली.

आग लागण्यामागचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. शॉर्ट सर्किट किंवा इंजिन गरम झाल्यानं आग लागली असावी, असा प्राथमिक तपासानंतरचा अंदाज आहे. पोलिसांनी घटनेची नोंद करुन तपास सुरु केला आहे.

## उच्च न्यायालयासाठी २ हजार २२८ पदांची निर्मिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाकरिता नव्याने २ हजार २२८ पदांची निर्मिती करण्यास करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

न्यायालयीन कामकाज गतीने होण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती. त्याचबरोबर न्यायालयीन कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्तेचा जास्तीत जास्त वापर करुन कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने २ हजार २२८ पदे निर्माण करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रक्रिया गतिमान होण्याच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सुविधेसाठी या पदाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई येथील मूळ शाखा व अपील शाखा आणि औरंगाबाद व नागपूर खंडपीठाकरिता गट-अ ते गट-ड संवर्गात अतिरिक्त पदांची निर्मिती करण्यात येत आहे. त्यानुषंगाने पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या पद निर्मितीसह या पदांसाठीच्या वेतन अनुदान व अनुषांगिक खर्चाच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. ही पदे गट-अ ते गट-ड या संवर्गातील आहेत. २ हजार २२८ पदांपैकी १७१७ पदे प्रशासकीय कामकाजाशी निगडीत आहेत. मंजूर झालेल्या पदांपैकी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेशी संबंधित ५६२, अपील शाखेशी ७७९, औरंगाबाद खंडपीठ ५९१ आणि नागपूर खंडपीठासाठी २९६ पदांची निर्मिती होणार आहे.

## पुण्यातील २ बड्या ठेकेदारांवर आयकर विभागाची मोठी कारवाई, घर- कार्यालयांवर छापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातून सध्या राज्याच्या दृष्टीने महत्वाची बातमी आली आहे. ती म्हणजे आज पुण्यामध्ये आयकर विभागाची कारवाई पाहायला मिळाली आहे. ही कारवाई राज्यातील दोन मोठ्या कंत्राटदारा्ंवर आयकर विभागाने आज सकाळपासून सुरु केली आहे.

आयकर विभागाकडूनची आजची ही धडक कारवाई पुण्यातील बडे ठेकेदार विजय धवांगळे, त्यांचे भाऊ अजय धवांगळे आणि विवेक बाळासाहेब गव्हाणे यांच्यावर ठेकेदारांवर करण्यात आली आहे. विवेक गव्हाणे यांच्या पुण्यातील सॅलीसबरी पार्क येथील घरावर तसेच मार्केट यार्डमधील त्यांच्या कार्यालयावर आयकर विभागाची छापेमारी सुरू आहे. तसेच त्याचबरोबर धवांगळे बंधूंच्या नागपूर आणि मुंबई येथील घरे व कार्यालयांवरही आयकर विभागाने छापे टाकले आहेत.

धवांगळे बंधूंच्या एस टू इन्फोटेक, वंश इन्फोटेक, लक्सर रिॲलिटी, वन ग्लोबल सर्व्हिसेस अशा शेकडो कंपन्या राज्यभर कार्यरत असल्याचे समोर आले आहे. हे ठेकेदार राज्य सरकारमधील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात कंत्राटे आणि पुरवठा करतात.

दरम्यान, याआधीही पुण्यात आयकर विभागाची कारवाई पाहायला मिळाली होती. याआधी विवेक गव्हाणे आणि त्यांच्या आशिष ट्रेडर्स या कंपनीवर अंमलबजावणी संचालनालयाने देखील कारवाई केली होती.

राज्य निवडणूक आयोगाची केंद्राकडे विनंती

३१ जानेवारीपर्यंत राज्यात निवडणुका

## आगामी निवडणुकांपर्यंत महाराष्ट्रात एसआयआर पुढे ढकलावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत महाराष्ट्रात एसआयआर पुढे ढकलण्याची विनंती राज्य निवडणूक आयोगाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे कारण देत राज्यातील मतदार यादीची विशेष सुधारणा पडताळणी मोहीम (एसआयआर) जानेवारी २०२६ पर्यंत लागू करण्याची योजना पुढे ढकलण्याची विनंती निवडणूक आयोगाला केली आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या सूचनेमुळे देशभरातील मतदार यादी पडताळणी मोहीम ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये सुरू होण्याची शक्यता दिसून येत होती. कारण, ३० नोव्हेंबरपर्यंत ही मोहीम संपवण्याचे काम केंद्रीय निवडणूक आयोगाने हाती घेतले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्या महिन्यात राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना महत्वाच्या सूचना केल्या होत्या. मतदार पडताळणीची (एसआयआर) मोहीम राबविण्यासाठी




३० सप्टेंबरपर्यंत यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले होते. ऑक्टोबरपासून देशभरात मतदार पडताळणीची मोहीम सुरू होणार असून नोव्हेंबरपर्यंत ही प्रक्रिया पार पाडण्याची सूचनाही आयोगाने केली होती. मात्र, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, राज्य निवडणूक आयोगाने एसआयआरची मोहीम पुढे ढकलावी, अशी मागणी केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने ९ सप्टेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाला पत्र पाठवले आहे. त्यानुसार, राज्यातील निवडणूक अधिकारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात व्यस्त असतील. त्यामुळे ही प्रक्रिया करण्यास विलंब लागणार असल्याचं कळवलं आहे. त्यामुळे, राज्यातील मतदार यादीची विशेष सुधारणा पडताळणी मोहीम (एसआयआर) जानेवारी २०२६ पर्यंत लागू करण्याची योजना पुढे ढकलण्याची विनंती निवडणूक आयोगाला केली आहे. आता, केंद्रीय आयोग यावर काय निर्णय घेईल ते लवकरच समजेल.


दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ च्या आपल्या आदेशाद्वारे राज्य निवडणूक आयोगाला महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश दिले आहेत. तर, ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया राबवावी, यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे, राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाकडून निवडणूक प्रक्रियेला गती आल्याचं पाहायला मिळत आहे. दुसरीकडे राजकीय पक्ष देखील कामाला लागले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात बैठका होत असून एकत्र लढायचं की स्वतंत्र अशी चर्चा होत आहे. तर, राज्यातील विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आजच राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन मतदार यादीतील घोळ, नाव नोंदणी, ईव्हीएम यासंदर्भात चर्चा केली आहे.

## संपादकीय....

# विरोधकांची मागणी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आयोगाने १ जुलै २०२५ची मतदारयादी अंतिम केल्याच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने चोक्कलिंगम यांची भेट घेऊन मतदारयादी आणि निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला. महापालिका निवडणुकांसाठी 'व्हीव्हीपॅट' न वापरण्याच्या निर्णयावर शिष्टमंडळाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'सन २०२२ मध्ये होणे अपेक्षित असलेल्या स्थानिक निवडणुका २०२६मध्ये होणार आहेत. गेल्या चार वर्षांत निवडणूक आयोग कोणती तयारी करीत होता? हजारो कोटी रुपये खर्च करून मागव-लेली 'व्हीव्हीपॅट' नक्की कुठे गेली? असे प्रश्न आघाडीच्या नेत्यांनी उपस्थित केले. आघाडीच्या शिष्टमंडळाने चोक्कलिंगम राज्य निवडणूक आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यासोबत विरोधकांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ईव्हीएमवरील जनतेचा विश्वास, व्हीव्हीपॅटचा वापर, प्रभाग पद्धती रद्द करण्याची मागणी, दुबार मतदार नोंदणी आणि सदोष मतदार याद्या यांसारख्या अनेक गंभीर मुद्द्यांवर चर्चा झाली. मात्र, या बैठकीत ठोस तोडगा न निघाल्याने सर्व मुद्द्यांवर एकत्रितपणे विचारविनिमय करण्यासाठी आज, बुधवारी पुन्हा एक संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. स्थानिक निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाकडे, तर मतदारयादीची जबाबदारी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे आहे. विरोधकांनी राज्य निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सामान्य जनतेचा 'ईव्हीएम'वर विश्वास नाही. त्यामुळे मतदारांसाठी खातरजमा करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'व्हीव्हीपॅट' आहे. तोच मार्ग तुम्ही बंद करणार असाल तर निवडणूक आयोगाच्या कारभारावर लोकांनी विश्वास कसा ठेवायचा? प्रभाग पद्धतीमुळे व्हीव्हीपॅट वापरता येत नसेल, तर ही प्रभाग पद्धतच रद्द करावी, अशी मागणीही विरोधकांनी केली. संपूर्ण भारतात महापालिका आणि नगरपालिकेतील प्रभाग निवडणूक पद्धत कुठेही अस्तित्वात नाही, याकडेही त्यांनी चोकलिंगम यांचे लक्ष वेधले. राज्यात मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये मोठ्या संख्येने परराज्यातून येणारे कामगार मतदार म्हणून नोंदणी करतात. यातील अनेक जण त्यांच्या मूळ राज्यातही मतदार असतात. त्यामुळे दुबार नोंदणी टाळण्यासाठी आयोग काय उपाययोजना करत आहे, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. बिहारमध्ये दुबार नावे काढण्यासाठी आयोगाने विशेष मोहीम राबवली, मग महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी असा प्रयत्न का दिसत नाही, अशी विचारणा त्यांनी केली. दुबार नोंदणी काढण्यासाठी 'डी-डुप्लिकेशन' पद्धतीचा वापर करण्याची मागणीही विरोधकांनी केली.

# बोजवारा गुणवत्तेचा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सध्या सर्वत्र परीक्षांचा हंगाम सुरू आहे आणि हा परीक्षांचा हंगाम सुरू झाला की टक्केवारी ,आकडे, रिझल्ट, प्रगती आणि गुणवत्तेचे वारे वाहू लागतात. मग त्यात विद्यार्थी पालक शिक्षक आणि शिक्षण प्रक्रिया सर्वांच्या समोर उभी राहते ती म्हणजे गुणवत्ता .पण कधी कोणी विचार केलाय का ? की ही गुणवत्ता म्हणजे नेमके काय?? कोणत्या परिमाणात ही मोजावी याचे निकष काय? याचा अभ्यासक्रम पाठ्यक्रम कोणता? आणि ही गुणवत्ता कोणत्या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासातून प्राप्त होते? कोणते शिक्षण घ्यावे व ते किती? आणि कुठपर्यंत घ्यावे? म्हणजे गुणवत्ता प्राप्त होईल! नेहमी हेच वर्गाचे गुणवत्ता गुणवत्ताधारक विद्यार्थी आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण यात कशाचा सम ावेश असावा.

पण एक विद्यार्थी, एक पालक आणि एक शिक्षिका म्हणून माझे विचार गुणवत्ता नावाच्या वाऱ्याभोवती तर फिरतातच पण त्याच्या अनेक अंगांचा विचार देखील करतात. पण हा विचार नेमका आ-ताच करण्याची गरज काय ?असाही प्रश्न आपल्याला पडला असेल. याचे कारण म्हणजे मागील काही दिवसापा-सून सातत्याने येणाऱ्या बातम्या वैद्यकीय अभियांत्रिकी एमपीएससी यूपीएससी इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी अमुक.... अमुक .नको असलेल्या अवाजवी अपेक्षांचा ओझं आणि याच ठराविक गुणवत्तेचा बोजवारा असह्य झालेले हे निष्पाप जीव .अशा बातम्या एकताना मन सुन्न होऊन जात . मग विचार प्रक्रिया सुरू होते .हीच आहेत का शिक्षण प्रक्रियेची ध्येय, उद्दिष्टे ?आणि हीच आहे का गुणवत्ता ?

गुणवत्ता व शिक्षण या सर्वांच्या अंतर्भूत आणि बाह्य विषयांचा विचार करण देखील अभिप्रेत आहे. वास्तव आहे आज मी माझ्या मुलांच्या शिक्षकांना जेव्हा भेटते तेव्हा टक्केवारी, गुण कधीच प्रथमतः विचारत नाही मी प्रथमतः प्राधान्य देते ती शाळेत कशी वागतात . ते शाळेत कोणत्या ॲक्टिव्हिटी करतात . त्यांचा रिस्पॉन्स कसा आहे. वर्तन कसे आहे .मूल्ये कशी आहेत यानंतर मी त्यांच्या विषयज्ञानाकडे वळते.

एखाद्या विद्यार्थ्याला ८०% ९०% ७० % गुण मिळाले तरी आपण असा विचार करतो की ९५ % का नाही ?९८ %का नाही ? म्हणजे उरलेल्या दहा पंधरा टक्क्याकडे आपण अधिक लक्ष देतो आणि जे मिळालेले आहेत ८० %,९०%, ७० %त्याकडे मात्र दुर्लक्ष करतो .जे नाही त्याचा शोध घेणे आणि जे आहे त्याकडे दुर्लक्ष करणे हे आपण सोडलं पाहिजे.

माझ्या दृष्टीने गुणवत्ता म्हणजे ठराविक अशी कोणतीही पातळी किंवा कोणतीही फक्त परीक्षा नाही जी दिल्याने गुणवत्ता मिळते . तर गुणवत्ता म्हणजे फक्त ९० % ९५ % ९८ % नव्हे फक्त अ - १ अ -२ नाही तर यासोबतच त्याचे वर्तन कसे आहे . तो खरे बोलतो, चोरी, लबाडी फसवणूक करत नाही. उत्कृष्ट नृत्य करतो, सुंदर गोड आवाजात गायन करतो, उत्कृष्ट कथा लिहितो, समजपूर्वक वाचन करतो, चुटकीसरशी गणिते सोडवतो. दैनंदिन आर्थिक व्यवहार करतो .मोठ्यांचा आदर करतो. शिस्तबद्ध स्वच्छ राहतो. सर्वांगीण सर्वांशी प्रेमाने. समानतेने वागतो, निसर्गाचा समतोल राखतो, माणुसकी जपतो, इतरांना समजून घेतो, अडचणीत मदत करतो, प्राणी मात्रांवर दया करतो, अधिकार व कर्तव्य यांचा समतोल राखत-ो, स्वतःच शरीर निरोगी राखतो, स्पर्धा खिलाडूवृत्तीने खेळतो, बचत करतो, कष्ट, मेहनत, परिश्रम करतो. मूल्यांची जपणूक व रूजवणूक करतो. उत्कृष्ट भाषण करतो, कविता लिहितो, चाली लावतो ,अभिनय करतो, कागदकाम, शेती काम, प्रायोगिक, प्रात्यक्षिक कार्य उत्तम करतो. नवे विचार नव्या संकल्पना मांडतो. आपला इतिहास जपतो, अभिमान बाळवतो. यासोबतच अनेक मूल्यांचा परिपोष करतो.

म्हणून तर शिक्षण प्रक्रियेत अमूलाग्र बदल केलेले आहेत ते म्हणजे CCE - सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन ज्यामध्ये गुणात्मक व संख्यात्मक, ज्ञानात्मक व कार्यात्मक या सर्वांचाच विचार केलेला आहे. म्हणून आपण गुणवत्तेचा फक्त संख्यात्मक बाबींनी विचार करून कसे चालेल ?यासाठीच CCE चा घाट घा-तला का शिक्षण तज्ञांनी विचारवंतांनी आणि शिक्षण प्रक्रियेने. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक क्षमतेचा प्रत्येक कौशल्याचा आणि त्याच्या प्रत्येक अंगभूत गुणांचा विकास होण्यासाठी हे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन आहे आणि याचाच विचार NEP -२०२० यामध्ये सुद्धा केलेला आपल्याला दिसतो. हे धोरण पूर्णपणे कौशल्याधिष्ठित जिवनाभिमुख NEP -2020 skill based ही शिक्षण प्रक्रिया आहे. हा विचार नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अंगाचा विचार म्हणजे गुणवत्ता .

शिक्षण प्रक्रियेतील जीवन कौशल्य, गाभाभूतघटक व मूल्ये यांचा विचार न करता फक्त टक्केवारी आणि ठराविक बाब नाही आली, एखादा घटक नाही आला, एखादी गोष्ट एखाद्या विद्यार्थ्याला आली नाही, तर त्याच्या इतर गुणांकडे दुर्लक्ष करून त्याने गुणवत्ता मिळवली नाही तो गुणवत्ता पूर्ण नाही असे म्हणणे कितपत योग्य ठरेल?

शिक्षण प्रक्रियेचे उद्दिष्ट म्हणजे जी-वनाभिमुख होणे मग एखादे गणित नाही सुटले, एखाद्या प्रश्नाचे उत्तर नाही आले तर तो विद्यार्थी गुणवत्ता पूर्ण नाही का? त्यांच्या इतर कौशल्यांकडे चांगल्या बाबींकडे म्हणजे तो उत्कृष्ट खेळ खेळतो, तो संवेदनशील आहे या गुणाने तो जी-वनाभिमुख होणार नाही का ? गुणवत्ता म्हणजे सर्वांगाचा विचार. एखादा शब्द तो वाचू शकला नाही! एखाद्या प्रश्नाचे उत्तर तो देऊ शकला नाही! एखादं गणित त्याला सुटलं नाही! म्हणजे तो विद्यार्थी गुणवत्ताधारक नाही असं म्हणणं कितपत योग्य आहे?

मग गुणवत्ता म्हणजे काय? हे एखादं -एखादं जे आहे ते येणं म्हणजे फक्त गुणवत्ता आहे का ? आज भारत आयुर्वेद योगा क्षेत्रामध्ये जगाचे प्रतिनिधित्व करत आहे. इथे कुठे आहे टक्केवारी ? मग ही गुणवत्ता नाही का ?

पण वास्तविकता अशी आहे की विद्यार्थ्यांचा प्रत्येक गुण ही त्याची गुणवत्ताच आहे .आणि फक्त टक्केवारी, लेवल, पातळी हे मिळवलं नाही किंबहुना कमी मिळालं तर त्याने गुणवत्ता मिळवली नाही अशी मानसिकता आज सर्वांची होताना दिसते. माझ्या दृष्टीने तर त्या विद्यार्थ्यांच्या वर्तनात इस्ट, अपेक्षित झा-लेला बदल, त्याच्या अंगभूत कौशल्यांचा गुणांचा मूल्यांचा झालेला विकास, म्हणजे गुणवत्ता. मग ती त्याच्या सामाजिक म ूल्यांची ज्ञानात्मक भावात्मक, क्रियात्मक, कौटुंबिक सहकार्यात्मक, संघर्षात्मक, शांतते विषयक, राष्ट्रीय मूल्य इत्यादी अनेक मूल्यांना आत्मसात करणे असेल ती त्याची गुणवत्ताच आहे .गुणवत्ता म्हणजे बोधात्मक व भावात्मक क्रियात्मक यासोबत यांच्या उपअंगांचा विकास होय.

एकांगी गुणवत्तेचा म्हणजे अमुक अमुक गोष्ट त्या विद्यार्थ्यांना आली नाही म्हणजे ते विद्यार्थी गुणवत्ता पूर्ण नाहीत असा होत नाही .गुणवत्तेच्या गाठोड्यात बदल झाला पाहिजे तो बोजवारा न होता परिवर्तनीय असला पाहिजे. एकांगी गुणवत्तेचा विचार करत बसलो असत-ो तर उत्कृष्ट लेखक, वाचक, कवी, नाटककार, नट, राजकारणी, उद्य-ोजक, शेतकरी, व्यावसायिक, कथाकार, भविष्यकार, वक्ता, श्रोता, शिल्पकार, डॉक्टर, इंजिनियर, शास्त्रज्ञ, अंतराळवीर, चित्रकार, कलाकार, गायक, वादक, सामाजिक कार्यकर्ता, उत्कृष्ट माणूस, न्यायदेवता, उत्कृष्ट कारागीर, खेळाडू, निर्माण झाले नसते.

बहुआयामी बहुगुणांचा बहुअंगी विचार विकास म्हणजे गुणवत्ता होय.

असं माझं मत आहे एखादी बाब नाही आली पण त्याला इतर अनेक बाबी येतात ती सुद्धा त्याची गुणवत्ताच आहे . या सर्व बाबींचा विचार मी करते म्हणूनच माझ्या विद्यार्थ्यांम ध्ये झालेला लहानात लहान सकारात्मक बदल ही सुद्धा त्यांची गुणवत्ताच समजते व ती वाढवण्यास प्रोत्साहन देते .गुणवत्तेचा बोजवारा करत नाही. आपणही कोणी तो करू नये तरच प्रत्यक्ष त्यात उत्कृष्ट काम करणारे मनुष्यबळ निर्माण होणार आहे विकसित होणार आहे.

इतिहासातील प्राचीन शिक्षण प्रक्रियांचा जरी विचार केला तरी शिष्याच्या कृतीत प्रत्येक गोष्ट जोपर्यंत येत नाही तोपर्यंत त्याचे शिक्षण पूर्ण झाले नाही असे मानून त्याला गुरुकुल सोडता येत नव्हते.

सगळी उदाहरणे सोडवतो सगळे, कठीण शब्द वाचन लेखन करतो, ज्ञानात्मक बाबी सर्व पूर्ण करतो, पण त्यांचा दैनंदिन जीवनात जर उपयोग करता येत नसेल तर त्याच्या अंगी मूल्य दिसत नसतील शिस्त सहकार्य दिसत नसेल? तर तो गुणवत्ताधारक झाला का? शिक्षक म्हणून मला विचारले तर नाही ! असे उत्तर मिळेल. शिकलेली गोष्ट कृतीत नसेल तर शिक्षण काय कामाचे यासाठीच गुणवत्ता एकांगी होऊ नये म्हणून तज्ञांनी विचारवंतांनी आणि सर्व शिक्षण प्रक्रियेंनी कौशल्याधिष्ठित शिक्षणाचा विचार केलेला आहे. गुणवत्तेला गुंडाळून शिक्षण प्रक्रियेची उद्दिष्टे आज भरकटताना दिसत आहेत. शिक्षणाला खूप महत्त्व दिलेले आहे. तरी पालक शिक्षक विद्यार्थी समाज व शिक्षण प्रक्रिया सर्वांनी गुणवत्ता म्हणून पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे. आपण व्यक्तिमत्व विकास स्पर्धा घेतो. कशासाठी घ्यायच्या या स्पर्धा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर बालमानसशास्त्र शिक्षण शास्त्र यांच्या साधर्म्याने बालकांच्या प्रत्येक क्षमतेचा विकास म्हणजे गुणवत्ता आणि ती साधने ही काळाची गरज आहे . म्हणूनच तर छएझ - २०२० नवे शैक्षणिक धोरण स्किल बेस्ड आहे. आपल्या प्रत्येक विद्यार्थ्यालाही त्याच्या सर्व क्षमतांचा विकास करण्याचा अधिकार आहे.

प्रत्येक कळीला अधिकार
हक्क आहे उमलण्याचा
ज्ञानाचे गुणांचे पंख लावून उडण्याचा
सर्व विद्यार्थ्यांना हक्क आहे सर्वांगीण विकास साधण्याचा.



विदयार्थ्यांवर अपेक्षांच ओझं न लादता त्याच्या अंगभूत कौशल्य गुणांचा स्वीकार करण्याचा विचार पालकांनी शिक्षकांनी सर्वांनीच करायला हवा. तरच ही निष्पाप सुंदरेफ ुले मोकळेपणाने फुलणार आहेत.

**- रिंकु अनंतराव जाधवर (धस)**
mob -९४०३४४९२८५

# बसमध्ये हरवलेला महागडा मोबाईल कळंबच्या वाहक कंडक्टरने केला परत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी,/सुधाकर रणदिवे : दि. १०/१०/२०२५ रोजी कळंब आगाराची कळंब ते सोलापूर बस क्रमांक एम एच-१४-९५१५ ही बस सोलापूर वरुन तुळजापूर धाराशिव मार्गे कळंब असा रूठ करत असताना तुळजापूर मध्ये प्रवासी उतरत असताना एका शिटवर सायलेंट मोडवर असणारा मोबाईल वाहक कंडक्टर सौ. निवेदिता रणदिवे यांना आढळून आला. तसा तो मोबाईल तुळजा-पूर आगारामध्ये जमा केल्यानंतर लगेच काही वेळाने मोबाईल धारक ( राकेश कुमार ) राहणार कर्नाटक याच्याशी संपर्क झाला. सदर महागडा मोबाईल वाहतूक नियंत्रक तुळजापूर यांच्या समक्ष प्रवाशास सुपूर्त केला. अशा प्रामाणिक पणे कर्तव्य बजावत असणाऱ्या वाहक कंडक्टर सौ. निवेदिता रणदिवे कळंब अगार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे..

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस मंदिर समितीकडून १ कोटीची मदत जमा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात शेत पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व देवस्थानांना केले होते.

या आवाहनास प्रतिसाद देत तसेच सामाजिक उत्तरदायित्व व मानवतावादी भूमिकेतून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने शासनाची मंजुरी घेऊन मुख्यमंत्री सहायता निधीस एक कोटी रुपयाच्या मदतीचा धनाद-ेश दिनांक १४ ऑक्टोबर रोजी मंत्रालय येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जमा केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार अभिजीत पाटील, मंदिर समितीच्या सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ड माधवीताई निगडे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, अतुल शास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.

## गळीत हंगामा करिता सहा लाख मे. टन पेक्षा जास्त गाळपाचे उद्दिष्ट : चेअरमन उमेश परिचारक

# युट्युपियन शुगर कारखान्याचे बॉयलर अग्नी प्रदीपन उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कचरेवाडी तालुका मंगळवेढा येथील युट्युपियन शुगर्स लिमिटेड या कारखान्याच्या २०२५/ २६ या बाराव्या गणित हंगामाचे बॉयलर पूजन व अग्नी प्रदीपन समारंभ मंगळवारी दिनांक १४/१०/२०२५ रोजी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते उत्साही वातावरणात संपन्न झाले प्रारंभी कारखान्याचे सीनियर इन्स्ट्रुमेंट इंजिनियर श्री कदम यांच्या शुभहस्ते सह पत्नी सत्यनारायण महापूजा व युनिट हेड श्री तुकाराम देवकते यांच्या हस्ते अग्नी प्रदीपन करण्यात आले.



यावेळी बोलताना चेअरमन श्री उम ेश परिचारक म्हणाले की आपल्या कारखान्याच्या हा बारावा गणित हंगामातून मागील ११ हंगामात युट्युबपियनने भरीव कामगिरी केली आहे व चालू गोळीत हंगाम मात सहा लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करून उसाच्या रसापासून व बी हेवी मॉलिशियस पासून १.५० कोटी लिटर इथेनॉल उत्पादित करणार असल्याचे मानस आहे. शासनाने दिनांक एक नोव्हेंबर २०२५ पासून गाळप परवाना दिलेला आहे त्यामुळे चांगल्या रिकवरीचा ऊस मिळेल. पहिल्या दिवसापासून कारखाना पूर्ण क्षमतेने चालवला जाईल चालू गळीत हंगामात उसाची उपलब्धता चांगली असून गत आकारही हंगामात ऊस उत्पादक व टोपियन कारखान्यास देण्यास प्राधान्य देत आहेत.

यापुढेही तेथील अशी खात्री आहे या हंगामात कारखान्याचे म ार्गदर्शक आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या सूचनेनुसार पंढरपूर मंगळवेढा सांगोला मोहोळ या तालुक्यातील कारखान्याच्या ऊस उत्पादक शेतकरी यांचा संपूर्ण ऊस गाळप केला जाईल त्यामुळे या उत्पादकाने चिंता न करता कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधावा असे आव्हान श्री परिचारक यांनी केल्याही कारखान्याचे यावर्षी दहा हार्वेस्टर मशीन घेतले आ-हेत तसेच अडीचशे ट्रॅक्टर दीडशे मिनी ट्रॅक्टर याप्रमाणे करार केले आहेत.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक म्हणाले की, संपूर्ण उसाचे गाळप करण्यासाठी कारखाना यंत्रणात सज्ज आहे ऊस उत्पादक शेतकरी कारखाना कर्मचारी यांना दिवाळी सणासाठी प्रति किलो २५ रुपये प्रमाणे साखर वाटप करण्यात येईल व सर्व कामगार वर्ग चालू गोळीत हंगाम यशस्वी करतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली सर्व कामगारांची दिवाळी गोड जाण्यासाठी कामगारांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ८.३३% बोनस दिला जाईल व या कार्यक्रमासाठी कारखान्याचे ऊस उत्पादन शेतकरी खाते प्रमुख काम गार मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ईडीपी मॅनेजर अभिजीत यादव यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कार्तिकी यात्रा : शासकीय महापूजेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मंदिर समितीकडून निमंत्रण

## सह. अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कार्तिकी यात्रा दरवर्षी कार्तिक शुध्द एकादशी या दिवशी भरते. सन २०२५ यावर्षी कार्तिकी यात्रा रविवार, दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता उपमुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येणार असून, महापूजेचे निमंत्रण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज दिनांक १४ ऑक्टोंबर रोजी मुंबई येथे मंदिर समितीकडून देण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ड. माधवीताई निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला.

कार्तिकी यात्रा कालावधी दर्शन रांग, रिद्धी सिद्धी दर्शन मंडप, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, येथे वारकरी भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी-सुविधांची तसेच यात्रा कालावधीत भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे याबाबत केलेल्या नियोजनाची माहिती तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन - संवर्धन काम व दर्शनरांगेतील प्रस्तावित स्कायवॉक व दर्शनहॉल संबंधीची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली.

# जेऊरवाडी येथे स्वच्छता अभियान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : मागील महिन्यात अतिवृष्टी झाल्याने गावामध्ये घाणीचे साम्राज्य पसरले होते. रोगराई पसरू नये यासाठी जेऊरवाडी येथे ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.यावेळी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊन स्वच्छतेमुळे होणारे फायदे, निरोगी आरोग्यासाठी आपल्या आजूबाजूचा परिसर कशा पद्धतीने स्वच्छता ठेवावा याबाबत सरपंच कमळाबाई राठोड यांनी माहिती दिल्या.

हनुमान मंदिरापासून स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात केली. जेऊरवाडी येथील मेन रोडचा संपूर्ण परिसर व शाळा, अंगणवाडी, मंदिर परिसर व ग्रामपंचायत कार्यालय आदी भागात स्वच्छता करण्यात आले. शक्य होईल तेवढे घाण, कचरा काढून स्वच्छता करण्यात आले.तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने अभियान राबविण्याचा संकल्प घेण्यात आला.

या स्वच्छता अभियानात गावकऱ्यांनी सहभाग नोंदवले होते. यावेळी सरपंच कमळाबाई राठोड, ग्रामसेवक रत्नाकर अभिवंत ग्रा.पं.सदस्य मीना जाधव, सीताबाई चव्हाण, तंटामुक्त अध्यक्ष नीलकंठ जाधव, पोलीस पाटील विजय चव्हाण, कर्मचारी सुभाष चव्हाण, रोजगार सेवक अप्पा भालेराव, मुख्याध्यापक त्रिभुवन जाधव, अशावर्कर ललिता राठोड, अंगणवाडी सेविका जयश्री राठोड, सुनिता राठोड, मदतनीस हिराबाई राठोड, सविता भालेराव, संदीप राठोड, सचिन भालेराव, भीमराव जाधव, पारुबाई ढाले आदी ग्रामस्त उपस्थित होते.

# जीवघेणी टीईटी रद्द करावी; ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : राज्यातील शिक्षकांच्या मुळावर उठलेली टीईटी परीक्षा तात्काळ रद्द करण्यात यावी. २००५ पुर्वी सेवेत दाखल झालेल्या सर्व शिक्षकांना विनाअट जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, पहिली ते बारावी पर्यंतचे सर्व शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश व दर्जेदार मध्यान्ह भोजन मोफत देण्यात यावे, शाळेत पुर्ण वेळ मोफत इंटरनेट, वीज, शुद्ध पाणी, सीसीटीव्ही कॅमेरे यांची सोय करावी, दिवाळी सुट्टी मध्ये घेण्यात येणारे प्रशिक्षण शाळा सुरू झाल्या नंतरच घेण्यात यावे यांसह पदवीधर शिक्षकांना सरसकट वेतनोन्नती द्यावी इत्यादी विविध मागण्यांचे निवेदन राज्याचे ग्रामविकास मंत्री महोदय सन्माननीय जयकुमार गोरे भाऊ यांना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने, जिल्हा अध्यक्ष श्री अनंत फुलसुंदर यांच्या सह शिक्षक बांधवांच्या उपस्थितीत देण्यात आले.

यावेळी मंत्री महोदयांचा तुळजाभवानी मातेची प्रतिमा देऊन संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने सर धाराशिव जिल्हा अध्यक्ष श्री अनंत फुलसुंदर सर, गोरे सर, माळी सर, सुरवसे, श्री पंकज काटकर, लहु सुरवसे, विशाल जाधव, भालेकर यांच्या सह शिक्षक बांधव उपस्थित होते.

# डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्काराने प्रशांत माळवदे सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत माळवदे यांना डॉ. कलाम राष्ट्र उभारणी पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले.

सोलापूर येथील व्ही व्ही पी कॉलेज येथे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम याच्या ९४ व्या जयंतीनिमित्त ड्रीम फाउंडेशन, डॉ. कलाम मिशन, कोचिंग क्लासेस असोसिएशन महाराष्ट्र राज्य व अन अकॅडमी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सीसीए चे राज्य अध्यक्ष प्रा. डॉ. पी एम वाघ यांच्या हस्ते प्रशांत माळवदे यांना शाल, प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी , आत्मीय एज्युकेशन पुणे रिजनल हेड डॉ. नीरजकुमार शहा, सीसीए राज्य सरचिटणीस ज्ञानेश्वर ढाकणे, व्हीव्हीपी कॉलेज सोलापूरचे अध्यक्ष प्रा.डॉ. जी के देशमुख, प्राचार्य कुलकर्णी आदि मान्यवर उपस्थित होते.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, धैर्यसिंह निंबाळकर, सरपंच रणजीत जाधव, उपसरपंच नितीन शिंदे, धोंडीराम शिंदे, प्रा. शशिकांत देशपांडे, शिक्षक रामचंद्र सावंत, धनंजय धोत्रे, आनंद देशपांडे,लुकमान इनामदार, बाळासाहेब कापसे, नागटिळक, राहुल ताटे,प्रा.वैभव घाडगे यांनी अभिनंदन केले आहे.

# नेत्र रुग्णांची सेवा करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो : अनंद काटकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : नेत्ररोग चिकित्सा अधिकारी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात जिल्हा परिषद धाराशिव च्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरीब नेत्र रुग्णाची सेवा करण्याची संधी मिळाली त्यामुळे मी हजारो नेत्र रुग्णांना मोतीबिंदू सारखे आजारावर उपचार करून त्यांना दृष्टी देण्याचे कुशल कर्म करू शकलो हे मी माझे भाग्य समजतो असे प्रतिपादन नेत्ररोग चिकित्सा अधिकार म्हणून सेवानिवृत्त झालेले अनंत काटकर यांनी नळदुर्ग ता.तुळजापूर येथे आयोजित सत्काराप्रसंगी बोलताना केले.

तुळजापूर तालुक्यातील लोहगाव येथील मूळ रहिवासी असलेले आनंद काटकर यांनी काही काळ उदगीर येथे तर प्रदीर्घकाळ तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग,अणदूर, जळकोट,सलगरा (दिवटी ) आदित ठिकाणी जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रात तब्बल ३१ वर्ष नेत्र चिकित्सा अधिकारी म्हणून गोर गरीब सामान्य नेत्र रुग्णाची सेवा केली. या प्रदीर्घ सेवा काळात त्यांनी हजारो नेत्र रुग्णांना मोतीबिंदू सारख्या रोगावर उपचार करून दृष्टी देण्याचं कुशल कर्म करून ते शेवटी उपजिल्हा रुग्णालय नळदुर्ग येथून नेत्र रुग्ण चिकित्सा अधिकारी म्हणून नुकतंच सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांच्या सेवानिवृत्ती बद्दल डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्ग येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्यावतीने रिपाइं (आठवले)चे नळदुर्ग शहराध्यक्ष तथा शिक्षण संस्थेचे संस्थाक मारूती खारवे यांच्या अध्यक्षते खाली त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते सत्काराला उत्तर देताना बोलत होते.

यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे जिल्हा सचिव एस के गायकवाड रिपाइं (आठवले) चे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे तालुका उपाध्यक्ष महादेव कांबळे भाजपा मीडिया सेलचे तालुका अध्यक्ष पत्रकार किशोर धुमाळ सह कार्यकर्ते उपस्थित होते.याप्रसंगी शुभेच्छा देताना बाबासाहेब बनसोडे म्हणाले की अनंत काटकर साहेबामुळे माझ्या डोळ्याच्या डोळ्याच्या मोतीबिंदूवर आजारावर यशस्वी उपचार केल्यामुळे आज मी त्यांचा हा सत्कार सोहळा उघड्या डोळ्यांनी पाहत असल्याने मला मनस्वी आनंद होत आहे.याप्रसंगी अरुण लोखंडे मारुती खारवे,एस के गायकवाड आदींची ही शुभेच्छा पर भाषणे झाली.

**आपला दाबला गेलेला इतिहास पुन्हा बाहेर काढावा लागेल : डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर**

# भिवंडी तालुक्यात ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व धम्म मेळावा उत्साहात साजरा!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारतीय बौद्ध महासभेच्या भिवंडी शाखेच्या वतीने ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि भव्य धम्म मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम रविवार, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील कवाड येथील कुणाल फार्म हाऊस येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय ट्रस्टी कार्याध्यक्ष आणि समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्रांती घडवून आणली. त्यांच्या संघटनांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. बौद्ध धम्म केवळ एका समाजापुरता मर्यादित ठेवू नका; आपला दाबला गेलेला इतिहास पुन्हा बाहेर काढावा लागेल. महाबोधी विहाराचा प्रश्न हा आपल्या अस्तित्वाशी जोडलेला आहे. येणाऱ्या जनगणनेमध्ये धर्माच्या कॉलममध्ये आपण बौद्ध असे लिहा. येणाऱ्या काळात आम्ही १० कोटींच्या वर पोहोचलो आहोत हे दाखवून द्यायला हवे - हीच बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीची खरी उपलब्धी आहे. असे यावेळी डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांनी भाषणात म्हटले.

या प्रसंगी ट्रस्टी चेअरमन हरीश रावलिया, राष्ट्रीय उपाध्यक्ष ड. जगदीश गवई, राष्ट्रीय उपाध्यक्ष ड. केसरीताई मौर्या, राष्ट्रीय सचिव राजेश पवार, केंद्रीय प्रशिक्षण विभागाच्या उपप्रमुख सुप्रियाताई कासारे, ठाणे जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष शीलाताई तायडे, उपाध्यक्ष हिरामण पगारे, कार्यालयीन सचिव प्रशांत गांगुर्डे, महिला सचिव सुशिलाताई गायकवाड, संघटक अशोक जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिवंडी तालुका अध्यक्ष रोहित जाधव होते, तर स्वागताध्यक्षा म्हणून रंजना भोईर यांनी जबाबदारी पार पाडली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'जनता', 'बहिष्कृत भारत' आणि 'जाती व्यवस्थेचे निर्मूलन' ही पुस्तके देऊन करण्यात आले. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा सामाजिक संदेशही यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. शशिकांत जाधव, संदीप जाधव आणि श्वेता भालेराव यांनी केले. समता सैनिक दलाच्या जवानांनी बँड पथकाच्या परेडने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडली. बदलापूर येथील महिला टीमने कथन अंधाराला भेदणारं हे प्रभावी नाट्यप्रयोग सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन भोईर, संजय गायकवाड, योगेश मोहिते, किशोर गायकवाड, समीर जाधव, धार्मिक गायकवाड, मंगेश गायकवाड, कैलास चव्हाण, दिलीप जाधव, सागर जाधव, संजय जाधव, महेश केदार, प्रमोद गायकवाड, श्वेता भालेराव, बारकुबाई गायकवाड, रेणुका पवार, रजनी गायकवाड, आश्विनी चन्ने, रीना जाधव, प्राची लोकरे, चेतना गायकवाड, सविता पवार आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अजय गायकवाड यांनी करून कार्यक्रमाची सांगता केली.

या सोहळ्यात धम्मक्रांतीचे विचार, संघटन आणि वाचन या त्रिसूत्रीचा संदेश देत बौद्ध समाजातील नवचैतन्य जागृत झाले.

# पंढरपूर येथे दिव्यांग बालकांसाठी विशेष शिबीराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, पी. पी. पेठकर यांच्या सहकार्याने पंढरपूर तालुका विधी सेवा समिती व अधिवक्ता संघ, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० नवजीवन निवासी अपंग शाळा, के.बी.पी. कॉलेज चौक, बायपास रोड, पंढरपूर येथे दिव्यांग बालकांसाठी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश. ए. एस. सलगर यांनी दिली.

या विशेष शिबीरामध्ये तालुक्यातील दिव्यांग बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार असून, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. दिपक धोत्रे यांचे मार्गदर्शनाखाली तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग बालकांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजना त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे याबाबत माहिती देण्यात येणार आहे. दिव्यांग बालकांसाठी असणाऱ्या योजनांचा तात्काळ लाभ मिळावा यासाठी शिबीराच्या ठिकाणी ऑनलाईन फॉर्म भरून घेण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

तालुक्यातील दिव्यांग बालक यांच्या पालकांनी आवश्यक कागदपत्रांसह नवजीवन निवासी अपंग शाळा, के.बी.पी. कॉलेज चौक, बायपास रोड, पंढरपूर येथे उपस्थित राहून शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ए. एस. सलगर यांनी केले आहे.

# मराठवाडा पूरग्रस्तांसाठी विक्रोळीकरांचा मदतीचा हात

## धान्यवाटप, शालेय साहित्य वाटप, कपडे, आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : अलीकडील मुसळधार पावसामुळे मराठवाडा विभागातील अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी आणि ग्रामीण जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर विक्रोळीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेत देवगाव, साकत आणि कुंभेफळ (ता. परांडा, जि. धाराशिव) या गावांमध्ये धान्य वाटप, आरोग्य तपासणी आणि औषधोपचार शिबिर आयोजित केले.



या मदत कार्यामध्ये स्थानिक नागरिकांसोबत विक्रोळीतील स्वयंसेवकांनी मनापासून सहभाग नोंदविला. शिबिराद्वारे अनेकांना तातडीची वैद्यकीय मदत मिळाली तसेच आवश्यक धान्यसामग्रीचे वितरण करण्यात आले. या मोहिमेच्या यशस्वी आयोजनामागे शंकर (नाना) धमाले आणि पूजा दळवी यांचे विशेष योगदान राहिले. त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून, पूरग्रस्त भागातील खरी गरज ओळखत योग्य ठिकाणी मदत पोहोचविण्याचे नियोजन केले. यासाठी सर्व स्वयंसेवकांना एकत्र आणून 'विक्रोळीकरांच्या वतीने सेवा करायची संधी' दिल्याबद्दल उपस्थित सर्वांनी त्यांचे आभार व्यक्त केले. या कार्यात डॉ. योगेश सुरेश भालेराव, हेमंत पाबळकर, दिनेश साहेब, अमित कांबळे, प्रभाकर षण्मुगम, राजन कोळी, समाधान जाधव, प्रशांत नाईक या उपक्रमाद्वारे विक्रोळीतील नागरिकांनी पुन्हा एकदा आपल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले असून, एक हात मदतीचा या भावनेतून पूरग्रस्तांना दिलासा मिळवून दिला.




# जन्मभूमी फाउंडेशन'तर्फे दुधनी येथे भव्य 'वाकॅथॉन' आणि आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : शारीरिक तंदुरुस्ती आणि पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यासाठी जन्मभूमी फाउंडेशनच्या वतीने दुधनी येथे एका भव्य 'वॉकॅथॉन (वाक्यातन स्पर्धा)' आणि मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यात एकूण ३३८ लोकांनी सक्रिय सहभाग नोंदवला (महिला १७०, पुरुष १६८).

या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हिरेमठ मादन हिप्परगा चलगेरी येथील श्री ष ब्र शांतवीर शिवाचार्य महा स्वामीजी आणि अक्कलकोटचे तहसीलदार श्री विनायक मगर यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्यासोबत जन्मभूमी फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले.

**वॉकॅथॉन: 'चालण्याची सवय' आणि 'जनजागृती'चा उद्देश**

या वॉकॅथॉनचा मुख्य उद्देश जनजागृती करणे आणि वयस्कर लोकांना चालण्याची सवय लागावी हा होता. तसेच, पर्यावरणामधील बदल या विषयावरही लक्ष केंद्रित करण्यात आले. स्पर्धकांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी महिला आणि पुरुषांसाठी वयोगटानुसार प्रत्येकी दोन गट (२५ ते ४० वर्षे आणि ४० ते ९० वर्षे) करण्यात आले होते.

**पुरुषांसाठी बक्षीस**

प्रथम बक्षीस: सायकल
द्वितीय बक्षीस: मोठी सुटकेस
तृतीय बक्षीस: छोटी सुटकेस

**महिलांसाठी बक्षीस**

प्रथम बक्षीस: मिक्सर
द्वितीय बक्षीस: सीलिंग फॅन
तृतीय बक्षीस: कुकर

आरोग्य शिबिर आणि समाजसेवा

वॉकॅथॉनसोबतच दुधनी प्राथमिक आरोग्य केंद्र, दुधनी यांच्या सहकार्याने एक आरोग्य शिबिर देखील आयोजित करण्यात आले होते. यामध्ये नागरिकांची बीपी (रक्तदाब), शुगर (मधुमेह) आणि रक्त तपासणी करण्यात आली, तसेच मेडिसीनचे (औषधांचे) मोफत वितरण करण्यात आले.

**संपूर्ण कार्यक्रमाची सांगता एका महत्त्व**पूर्ण सामाजिक संदेशाने झाली. कार्यक्रम संपल्यावर परिसरात पडलेल्या पाण्याचे बोटल, केळीची साले आणि इतर कचरा जन्मभूमी फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी स्वतः उचलून परिसर स्वच्छ केला. या कृतीतून त्यांनी नागरिकांसमोर स्वच्छता आणि पर्यावरणाचे उत्तम उदाहरण ठेवले.

हा कार्यक्रम आरोग्य, तंदुरुस्ती आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत दुधनीकरांसाठी एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# सर्वोच्च न्यायालयातील असभ्य घटनेचा कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेतर्फे तीव्र निषेध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान एका व्यक्तीने 'बूट फ `कण्याचा प्रयत्न' केल्याची अत्यंत खेदजनक आणि अशोभनीय घटना घडली. ही घटना केवळ सरन्यायाधीशांच्या व्यक्तिशः सन्मानावरच नव्हे, तर संपूर्ण भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेवर गंभीर आघात करणारी आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयात अशा प्रकारची अमर्याद आणि अपमानास्पद कृती होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. न्यायालय हे केवळ न्यायदानाचे स्थान नसून, ते संविधानिक मूल्यांचे, विवेकाचे, संयमाचे आणि संस्कारांचे प्रतीक आहे. त्या मंदिरात झालेला हा अपमान म्हणजे लोकशाहीच्या आणि न्यायसंस्थेच्या आदर्शांवर झालेला थेट प्रहार आहे.

यावेळी या घटनेचा कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेतर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. संघटनेने सर्व वकील बांधवांनी लाल पट्टी लावून शांततामय निषेध केले. तर यावेळी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालय परिसरातून सर्व वकील बांधवांनी एकत्र येऊन कल्याण तहसीलदार यांना औपचारिक निवेदन सादर केले.निवेदनाद्वारे शासनाला हे कळविण्यात आले की, अशा प्रकारच्या घटनांमुळे न्यायसंस्थेवरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात कोणत्याही न्यायमूर्ती, न्यायाधीश किंवा न्यायालयाच्या सन्मानाला धक्का पोहोचेल अशा घटना होऊ नयेत, यासाठी शासनाने तातडीने प्रतिबंधात्मक आणि दंडात्मक उपाययोजना कराव्यात.

यावेळ कल्याण जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश रा. जगताप, उपाध्यक्ष : ॲड. गणेश पाटील, सहसचिव ॲड. सुशील धनगर, कार्यकारिणी सदस्य : ॲड. प्रदीप बावस्कर माजी अध्यक्ष : ॲड. राजोळे, ॲड. शंकर रामटेके, ॲड. राजू राम, ड. बनसोडे , ॲड. अजिंक्य साळवे, ॲड. दया घोडेराव, ॲड. रुपेश कांबळे, ड. संग्राम मोरे, ॲड. महेंद्र आयगोळे, आकाश बोईनवाड तसेच वरिष्ठ वकील बांधव आणि नवोदित वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला व्हॉट्सअॅप क्रमांकावर (९९२३३२३३११) मेसेज पाठवा : पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे : नाशिक शहर हा कायद्याचा बालेकिल्ला असून तो कायमच राहणार आहे. या शहरात कोणीही भाई, दादा, बॉस, सरकार नाही. जर कोणी धमकावत असेल आणि अशा प्रकारे दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल तर नाशिक सीपी व्हॉटस्अॅप क्रमांकावर (९९२३३२३३११) एक मेसेज पाठवा, त्याचा नाशिक पोलिसांकडून 'योग्य' तो बंदोबस्त केला जाईल आणि तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवले



जाईल, याबाबत विश्वास बाळगावा. नाशिक शहराला गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा, असे आवाहन पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी केले आहे.

# रतनसिंग राठोड यांचा सामाजिक स्तुत्य उपक्रम : तुकाराम राठोड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : देवाची सेवा करण्याचा सर्वात मोठा मार्ग म्हणजे गरिबांना मदत करणे होय.अत्यंत काळजीपूर्वक अक्कलकोट तालुक्यातील तोळणुर तांडा येथील श्री सेवालाल महाराजांचे पुजारी रतनसिंग राठोड यांनी गरीब व गरजूंना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला.

ज्याचा फायदा२५गरजू गरीब लोकांना झाले असल्याचे प्रतिपादन बंजारा समाजाचे जेष्ठ समाजसेवक तुकाराम राठोड यांनी केले.

अक्कलकोट तालुक्यातील जेऊरवाडी तांडा, शिवगुंड तांडा व तोळणुर तांडा येथील श्री सेवालाल मंदिर येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते किराणा साहित्याचे किट वाटप केले. तत्पूर्वी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टी पावसामुळे गोरगरीब व गरजू कुटुंबीय त्रस्त होते. आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून रतनसिंग राठोड यांनी

**गरीब व गरजू पंचवीस लोकांना किराणा साहित्य किट वाटप**

गरीब व गरजू लोकांना किराणा धान्य किट वाटप केले.धान्याचे किट घेताना गरीब निष्पाप चेहऱ्यांचा आनंद आणि समाधान दिसुन आला.

रतनसिंग राठोड हा युवक अत्यंत गरीब व हलाखीचे जीवन जगत आहे तरी अशा कठीण प्रसंगात देखील ते मदतीचा हात पुढे केले आहे.

ज्यांना समाजाची स्पंदन समजतात त्याच व्यक्ती भविष्यात गौरवशाली परंपरा निर्माण करु शकतात. हे रतनसिंग राठोड यांच्यामध्ये असून येतो. दिवाळीच्या सणावर कीट वाटप केले.खरोखर त्यांचे कार्य कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे असे मत श्रीमंत राठोड नाईक यांनी बोलताना म्हणाले.



आपण समाजाचे देणे लागतो ही भावना आपण जेव्हा स्वतःअवलंबतो आणि तसेच वातावरण घरात निर्माण होत असते.म्हणतात ना,संस्कार हे घरातूनच होत असतात.असेच उदाहरण म्हणजे रतनसिंग राठोड यांचा आहे. गरीब व गरजू लोकांना धन्याचे किट देऊन समाजात मोलाचे काम केले.माझ्या दृष्टीने फार अभिमानाची बाब आहे.असे माजी सरपंच शिवलाल राठोड यांनी बोलताना व्यक्त केले.

यावेळी श्रीमंत राठोड नाईक, माजी सरपंच शिवलाल राठोड, काशिनाथ राठोड, पुजारी, सिद्धया हिरेमठ, गुरुशांत काबणे, काशिनाथ पाटील, संतोष राठोड, सुभाष चव्हाण शिपाई, नामदेव राठोड, अक्षय राठोड, अजित राठोड, संदीप राठोड, सुभाष जाधव चॉईस टेलर, अंबादास राठोड, पत्रकार आजीतसिंग राठोड आदी उपस्थित होते

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या शैक्षणिक व सामाजिक हक्क व समस्येबाबत चर्चासत्र**

**महिला विकास कक्ष व दत्तक पालक योजना समितीचा अनोखा उपक्रम**

# मुलींनो अन्याय सहन करू नका, कायद्याचे ज्ञान आत्मसात करा : ॲड. सोनाली कटकधोंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विद्यार्थिनींनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात होणारा अन्याय सहन करू नये, कायद्याने त्यांना संरक्षण दिले आहे. संविधानाने मूलभूत हक्क दिले आहे, त्याचे अवलोकन करून कायद्याचे ज्ञान आत्मसात करावे, त्यामुळे आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल असे प्रतिपादन अँड सोनाली कटकधोंड यांनी केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील महिला विकास कक्ष व दत्तक पालक योजना समितीच्या वतीने आयोजित केलेल्या विद्यार्थिनींच्या सामाजिक, शैक्षणिक हक्क व समस्या या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे, प्रा मनीषा शिंदे, प्रा प्राची गणेचारी उपस्थित होते.

यावेळी प्रा शितल झिंगाडे-भस्मे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना अनेक अडचणी व समस्या भेडसावतात, त्या अत्यंत खंबीरपणे अडचणींना सामोरे जाऊन अन्याय सहन करतात, त्यांना त्यांचे हक्क व कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे निमुटपणे सर्व काही सहन करतात. त्यांनी आता संविधानात सांगितल्याप्रमाणे कृती केली पाहिजे, आपले हक्क मिळवले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्राची गणेचारी यांनी केले सूत्रसंचलन कु सानिया शेख यांनी केले तर आभार प्रा मनीषा शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

**विद्यार्थिनी व प्राध्यापिकाचा संवाद**

**महिला विकास कक्ष व दत्तक पालक योजना विभागाच्या वतीने सामाजिक व शैक्षणिक समस्येबाबत विद्यार्थिनी आपल्या मनातील शंका प्राध्यापिकांसमोर व्यक्त केल्या, त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली.**

**महिला सबलीकरणासाठी प्रयत्न व्हावेत**

**आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी महिला सबलीकरणासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील सर्व घटकांकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे. सरकारने देखील महिलांना सुरक्षितता देणे आवश्यक आहे. असे अँड सोनाली कटकधोंड यांनी आपल्या भाषणातून सांगितले.**